साप्ताहिक

पत्रकारितेचे मूल्य जतन करणारे वृत्तपत्र

# न्यायस्वातंत्र्य समता

संपादक - रमेश अ. शेळके कार्यकारी संपादक - ॲड. चंद्रकांत गायकवाड RNI NO. : MAHMAR /2010/36016

■ वर्ष - ५ ■ अंक - ३७ वा ■ सोमवार दि. ५ ते ११ ऑक्टोबर २०१५ ■ किंमत - २ रुपये ■ पाने ४

## नवोदित पत्रकारांनी आपले काम करीत असताना पत्रकारितेची मुल्ये जपावीत - संतोष गोगले






पुणे : भटक्या विमुक्त आदिवासी संघटना, महाराष्ट्र राज्य व साप्ताहिक न्यायस्वातंत्र्य समता च्या वतीने आयोजित पत्रकारिता प्रशस्ती पत्रक वितरण सोहळ्यात ते बोलत होते, पुढे त्यांनी पत्रकारिता करत असताना सामाजिक भान ठेवून, कोणत्याही अभिषाला बळी न पडता सत्याची कास धरून घडलेली बातमी कोणत्याही प्रकारची भेळ-मिसळ न करता सहज आणि सोप्या भाषेत समजेल अशा पध्दतीने लोकांपर्यंत पोहचवावी. असे मार्गदर्शन केले. पुढे बोलताना त्यांनी असे झाले तरच लोक, तुमच्या वृत्तपत्रांवर विश्वास ठेवतील. अन्यथा तुम्ही सन्मानापासुन वंचित रहाल अशी भिती व्यक्त केली. प्रेरणाज् मिडीया ॲण्ड मास कम्युनिकेशन्स् च्या वतीने ५ महिन्याचा पत्रकारिता प्रशिक्षणाचे वर्ग, शिक्षकभवन, पुणे येथे घेण्यात आले. या प्रशिक्षणात तीस विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन अभ्यासक्रम पुर्ण केला. प्रशिक्षण पुर्ण केलेल्या सर्वांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन येथील सभागृहात प्रशस्ती पत्रक देऊन गौरविण्यात आले.

या प्रशिक्षणामध्ये, आशा कांबळे, अशा शर्मा, नुतन चव्हाण उषा चाबुकस्वार, वर्षा वेलादी, भाग्यश्री जांभळे, मनिषा खोमणे, सप्रेमा ननावरे, संजय साळुंके, जॉय साबळे, विजय गायकवाड, दिगंबर गायकवाड, निलेश गायकवाड, राजू गायकवाड, हेमलता पाटील, शैलेंद्र कांबळे, भाग्यश्री नाईक, राजेश आल्हाट, मुकेश चव्हाण, अक्षय लांडगे, दौलतराव धेंडे, भारती गड्डम, सुरेश दाभाडे, सौरभ उपासे, निलकंठ, बळी– , मनोज खोपडे, दिगंबर कदम, प्रविण आंग्रे, अमोल वाघमारे, ॲड. प्रदीप जानी यांनी भाग घेतला.

ज्येष्ठ पत्रकार संतोष गोगले, साप्ताहिकाचे संपादक रमेश शेळके, व कार्यकारी संपादक ॲड. चंद्रकांत गायकवाड, यांच्या हस्ते प्रशस्तीपत्रक वितरण सोहळा पार पडला. या समयी ॲड. चंद्रकांत गायकवाड प्रस्तुत गीत गाता चल या हिंदी-मराठी गाण्यांचा सांस्कृतिक कार्यक्रमाने उपस्थितांची मने जिंकली.

## ७/११ मुंबई बॉम्बस्फोट खटल्यात पाच दोषींना फाशी; सात जणांना जन्मठेप; मोक्का न्यायालयाचा निकाल



मुंबई : मुंबईत ११ जुलै २००६ रोजी झालेल्या साखळी बॉम्बस्फोट प्रकरणी दोषी ठरलेल्या १२ पैकी पाच आरोपींना फाशीची तर उर्वरित सात जणांना जन्म-ठेपेची शिक्षा विशेष मोक्का न्यायालयाने आज सुनावली. तब्बल ९ वर्ष चाललेल्या या खटल्यातील १३ पैकी १२ आरोपींना विशेष न्यायालयाने ११ सप्टेंबर रोजी दोषी ठरविले होते तर एकाची निर्दोष मुक्तता केली होती.

कमल अहमद अन्सारी (वय ३७), एहतेशाम सिद्दिकी (३०), मोहम्मद फैसल शेख (३६), नावेद हुसैन खान (३०) व आसिफ बशीर खान (३८), अशी फाशीची शिक्षा सुनावण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत तर तन्वीर अहमद अन्सारी (३७), मोहम्मद माजिद शफी (३२), शेख आलम शेख (४१), मोहम्मद साजिद अन्सारी (३४), मुझम्मील शेख (२७), सोहेल मोहम्मद शेख (४३) व जमीर अहमद शेख (३६) यांना जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली आहे. या खटल्याची सुनावणी पूर्ण झाल्यानंतर विशेष मोक्का न्यायालयाने ११ सप्टेंबर रोजी १२ आरोपींना दोषी ठरविले होते तर एकाची निर्दोष मुक्तता केली होती. त्यानंतर दोषी आरोपींच्या शिक्षेबाबत दोन्ही बाजूंचे युक्तिवाद २१ सप्टेंबर रोजी पूर्ण झाले होते. न्यायालयाने दोषी ठरविलेल्या १२ आरोपींपैकी त्यातील बॉम्ब ठेवणारे आणि बॉम्ब कुठे ठेवण्यात यावे याचा निर्णय घेणाऱ्या आठ आरोपींना फाशीची शिक्षा देण्याची मागणी सरकार पक्षातर्फे करण्यात आली होती. मात्र, आज झालेल्या सुनावणीत विशेष मोक्का न्यायालयाने १२ आरोपींपैकी कमल अन्सारी, एहतशाम सिद्दिकी, मोहम्मद शेख, नावेद हुसैन खान, आतिफ बशीर खान या पाच आरोपींना फाशीची शिक्षा सुनावली. या पाच आरोपींवर प्रत्यक्ष कटात सहभाग, कटाची आखणी करणे आणि बॉम्ब ठेवण्याचे आरोप सिद्ध झाले. उर्वरित सात जणांना कटात सहभागी असल्याच्याआरोपांखाली जन्म-ठेपेची शिक्षा सुनावण्यात आली आहे. दरम्यान, विशेष मोक्का न्यायालयाने दिलेल्या या निकालावर बचाव पक्षाचे वकील आणि आरोपींच्या नातेवाइकांनी नाराजी व्यक्त केली असून या निकालास मुंबई उच्च न्यायालयात आव्हान देण्याचा निर्णय घेतला आहे. ११ जुलै २००६ रोजी पश्चिम उपनगरीय लोकलमध्ये १० मिनिटांच्या कालावधीत पश्चिम रेल्वेवरील खार रोड-सांताक्रूझ, वांद्रे-खार रोड, जोगेश्वरी-माहीम जंक्शन, मीरा रोड-भाईंदर, माटुंगा-माहीम या स्थानकांदरम्यान आणि बोरिवली स्थानकामध्ये साखळी बॉम्बस्फोट झाले होते. या साखळी बॉम्बस्फोटांमध्ये १८९ निरपराध नागरिकांचा मृत्यू झाला होता तर ८०० हून अधिक जण जखमी झाले होते.

## सांगवी पोलिसांचे मंडळांकडून आभार



दरवर्षी प्रमाणे यंदाच्या वर्षी ही सांगवी परिसरातील गणेशोत्सव अगदी आकर्षक व दिमाखदार पद्धतीने साजरा झाला कोणत्याही प्रकारचा गैरप्रकार घडवून न देता शांततेत व पारंपरिक पध्दतीत पार पाडण्यासाठी प्रयत्न केले. गणेशोत्सवाच्या काळात दिवसरात्र काम करून नागरिकांची काळजी घेवून प्रत्येक वेळेस नागरिकांना सुरक्षा देण्याचे काम पोलिस करत असतात तसेच वेळोवेळी प्रत्येक मंडळांना सल्ले देवून सहकार्य करीत गणेशोत्सव शांततेत व सुव्यवस्थित

(पान ३ वर)

विजयादशमी विशेषांक २०१५

अंकासाठी, अप्रकाशित साहित्य, प्रकाशनाच्या पत्त्यावर पाठविणे

दर्जेदार लेख, कविता, कथा यांना प्राधान्य दिले जाईल.

संपर्क - ९५६१९२४३२३

## संपादकीय ...

# बापू हवेत !

२ ऑक्टोंबर राजी तमाम भारतीयांनी देशात, परदेशात, महात्मा गांधी जयंती महोत्सव साजरा केला. राष्ट्रपती ते पंतप्रधान, राज्याचे मुख्यमंत्री तसेच विरोधी पक्षातील राजकारण्यांनी गांधी जयंतीचे औचित्य साधून आज बापूंच्या विचाराची गरज असून आम्ही बापूंच्या विचारांवर कसे वाटचाल करीत आहोत असे लोकांना सांगण्याचा अटोकाट प्रयत्न केला. स्वातंत्र्यपुर्व काळात, बापूंच्या नेतृत्वांचा जिकडे-तिकडे बोलबाला होता. अन्यायी, अत्याचारी इंग्रज राजवटीचा जशास तसे उत्तर देण्याऐवजी हिंसेला-अहिंसेने उत्तद देण्याचा बापूंचा ठाम निर्धार, व त्याचे परिणाम पाहून बापू भारतीयांच्या राज्यातील ताईत कधी बनले हे त्यांना ही समजले नसावे. साधी राहणी, बोलण्यात कमालीची शालीनता, सदैव सत्यासाठी, प्राणाची आहुती देण्याची तत्परता, त्यांचा शब्द म्हणजे काळ्या दगडावरची रेघ. अनुयायी बापूंच्या आदेशाची वाट पाहत व त्यांच्या आंदोलनात सहभागी होण्यासाठी जीवाचे रान करीत असे. त्यांचा वाढता प्रभाव जनतेचा त्यांच्यावरील विश्वास पाहून त्या काळातील पुढारी बापूंच्या आश्रयाला असायचे. बापूंच्या बरोबर राहून व त्यांनी आपले कार्य तडीस नेल्याचे निदर्शनास येते. आज स्वतंत्र भारतात देशाचे नेतृत्व करणारे पुढारी पाहिले की, हा बापूंचा देश आहे का? हा प्रश्न पडतो.

त्यावेळचे नेते, पुढारी, इंग्रजी जुलमी राजवटीत छातीची ढाल करून वावरायचे, आजचे नेते आपल्याच भारतीयांच्या समोर, पोलीसांच्या अंगरक्षकांच्या गराड्यात वावरत असतात. अहोरात्र त्यांना संरक्षणाची गरज भासते. प्रोटोकॉल च्या नावाखाली देशातील, पोलीस यंत्रणा या नेत्यांच्या हिमतीला असते. आजपर्यंत हजारो अधिकारी नेत्यांचे अंगरक्षण करता करता सेवानिवृत्त झाले. ज्या ध्येयाने तरुण पोलीस दलात सामील होतात. त्यांचे ध्येय कधीच — पडते. अशा डरपोक नेत्यांचा जीवनक्रम पाहता-पाहता हे अधिकारी निमूटपणे सेवा निवृत्त होतात. अजून असे किती अधिकारी निवृत्त होतील हा येणारा काळच सांगेल. लोकांचे नेतृत्व करत असताना देशासाठी बलीदानाची तयारी ठेवणारे बापू व आजचे तथाकथित पुढारी पाहिले की प्रचंड विरोधाभास नजरेस पडतो. जुलमी राजवटीत निधड्या छातीने वावरणारे पुढारी आणि स्वतंत्र भारतात आपल्या लोकांसमोर, अनुयायांसमोर अंगरक्षकाच्या गराड्यात वावरणारे पुढारी, हे चित्र बदलण्याची गरज आहे. निधड्या छातीने वावरणारे पुढारी पाहण्यासाठी जनता आसुसलेली आहे. आज भारतात लोकशाहीची — मुळे अगदी घट्ट रोवली गेल्याचे दिसून येते. राज्यांमध्ये नवनवीन पक्ष सत्तेकडे मुसंडी मारताना पाहून घटनाकारांनी पाहिलेले स्वप्न सत्यात उतरताना दिसते आहे. लोकांना फसवूण, आमिषे देवून, सत्तेत राहण्याचे दिवस आता संपले असून, निवडणुकांच्या माध्यमातून तरुण, तडफदार, आधुनिक विचारांचे, राज्यांच्या प्रगतीचे स्वप्न पाहणारे. नेर्तृत्व यशस्वी होतानाचे चित्र दिसते आहे. एकीकडे हे सगळे घडत असताना सामाजिक स्वास्थ्य बिघडण्याचे भयानक चित्र दिसत आहे. प्रत्येक राज्यांमध्ये, गुन्हेगारीचे प्रमाण वाढत आहे. हत्याकांडांचे सत्र चालूच आहे. आजचे पुढारी शेती, बेरोजगारी, शिक्षण, आरोग्य, व्यसनाधिनता, आदि प्रश्नांची उत्तरे शोधण्यात रस घेत नाहीत. त्यामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्या, बेरोजगारांची वाढती संख्या, अर्धवट शिक्षण सोडणारे विद्यार्थी, व व्यसनाधिनतेने समाजमन ढवळून निघाले आहे. लोक अहिंसेपेक्षा हिंसेला प्राधान्य देत आहेत. शिक्षणातील कस कधीच निघून गेल्याने शाळा, कॉलेजच्या बाहेरील विद्यार्थ्यांचा एकमेकांशी अर्वाच्या भाषेत शिव्या देत असलेला संवाद व्यथीत करून जातो. याकडे कोणाचेही लक्ष नाही. सगळे लोक डोळेझाक करतात. बुजुर्ग लोक निमुटपणे धुडगूस पाहून येणाऱ्या काळामध्ये भारताची काय अवस्था होईल. हे सांगायला कोण्या तत्ववेत्त्यांची गरज भासणार नाही. ना पालकांचा, ना शिक्षकांचा, ना पोलसांचा, ना संस्कृतीचा धाक यामुळे ही पिढी, स्वतःला, कुटुंबाला, राज्याला पर्यायाने देशाला, काळीमा फासत आहे. आज इंग्रजांचे राज्य नाही सगळे मोकळा श्वास घेत आहेत. परंतु समाजमनात अराजक माजले आहे हे अराजक दूर करण्यासाठी बापू तुम्ही हवे आहेत.


'न्यायस्वातंत्र्य समता' हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक रमेश अभिमन्यू शेळके यांनी यश एन्टरप्राईजेस डी १४ साई सयाजीनगर वारजे,पुणे-४११०५८ येथे छापून सर्व्हे नं. ४/१२ महात्मा फुले वसाहत कोंढवा खुर्द, कमेला पुणे - ४११०४८ येथून प्रकाशित केले.

(या अंकामध्ये छापलेल्या मजकुरांशी संपादक / प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. वादविवाद पुणे न्यायकक्षेत).

# पाऊस आला; अन् गेला! दुष्काळ मात्र कायम राहिला !

राज्यात अखेरपर्यंत समाधानकारक पाऊस पडला नाही. परिणामी खरिपाची शेतकऱ्यांनी पेरणी केलेली थोडीफार पिके हातची गेली आहेत. दरम्यान चालू वर्षीची नैसर्गिक परिस्थिती पाहता शासनाने दुष्काळसदृश परिस्थिती जाहीर करावी. गेल्या काही वर्षात दुष्काळाची समस्या अधून - मधून डोके वर काढत असल्यामुळे त्याबाबत राज्य सरकारने महत्त्वाची भूमिका घेऊन दुष्काळाचा सामना करण्यासाठी प्रभावी उपाययोजना अवलंबून त्याची प्रत्यक्षात अंमलबजावणी होणे गरजेचे आहे.

दरम्यान पावसाची दुष्काळाची झळ सत्ताधाऱ्यांना पोहचत नसल्याने राजकीय स्वार्थापोटी त्यांनी दुष्काळाबाबत अवलंबलेली धोरणेही कूचकामी ठरतात. अशावेळी सर्वसामान्य शेतकरी आणि हातावर पोट भरणाऱ्यांचे हाल होतात. ही परिस्थिती सत्य आणि वास्तववादी असल्याचे नमूद करावेसे वाटते. सध्याची परिस्थिती पाहता यंदा राज्यातील महत्त्वाची धरणे पाण्याने पूर्ण क्षमतेने भरली नाहीत. गेल्या वर्षीची धरणांच्या पाण्याची परिस्थिती पाहिली तर जुलै महिना अखेर सर्वच धरणांमध्ये सरारी ६० टक्क्यांपेक्षाही अधिक पाणीसाठा उपलब्ध होता. या वर्षीचे प्रमाण पाहता ४० टक्क्यांपेक्षाही धरणांमध्ये कमी पाणीसाठा आहे. याचाच अर्थ असा की यंदा जुलै महिना अखेर राज्यात गतवर्षीपेक्षा पावसाचे प्रमाण सरासरी पन्नास टक्केने कमी असल्याचे दिसून येते. यावर्षी तर विदर्भ आणि मराठवाड्यात शेतकऱ्यांच्या सर्वात जास्त आत्महत्याा झालेल्या जिल्ह्यांमध्ये पाऊसच न पडल्याने अगोदर आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण जास्त असलेल्या या भागात शेतरकी दुष्काळाचा सामना कसा करतील, हा प्रश्न खरोखरच चिंताजनक आहे. कोयना धरणांमध्ये पाण्याचा अत्यंत अल्प साठा उपलब्ध असल्याने या वर्षी प्रकल्पातून होणाऱ्या वीजनिर्मितीत घट झाली आहे. परिणामी पाण्यावर वीज निर्मिती होणाऱ्या धरणांच्या जलाशयात पाणीच उपलब्ध नसल्याने सरकारने वीजकपातही केली. वास्तविक पाहता गेल्या दोन वर्षीदेखील राज्यातील पावसाचे प्रमाण कमी होते. राज्य सराकरच्या आर्थिक सर्वेक्षणामध्ये नमूद करण्यात आले आहे की, राज्यातील जल आणि सिंचन आयोगाने सांगितल्याप्रमाणे राज्यात सर्व प्रकारच्या सिंचनाखाली जमिनीचे प्रमाणे १२६ लाख हेक्टरपर्यंत नेणे शक्य आहे. आजमितीस हेच जमिनीचे क्षेत्र ५५ ते ६० लाख हेक्टरपर्यंत आहे आणि त्यापैकी फक्त २२ लाख हेक्टर जमिनीला प्रत्यक्षात पाणी उपलब्ध आहे. त्याचे खरे कारण म्हणजे जमीन सिंचनाखाली येण्यासाठी कालव्यांची कामेच करण्यात आली नाहीत. अन केलेल्या कालव्यांचे व्यवस्थापन ढासळ्यासारखे आहे. त्यामुळेच आता



राज्य सरकारला कृष्णा खोरे किंवा अन्य प्रकल्पांच्या खासगीकरणाची स्वप्ने पडू लागली आहेत. मात्र दुष्काळावर मात करण्यासाठी काहीही उपाययोजना करण्याचे गांभीर्य राज्य सरकारकडे नाही. ही अत्यंत खेदजनक बाब वाटते.

पुणे जिल्ह्यातील कुकडी प्रकल्पांतर्गत असणाऱ्या धरणातील पाणी साठ्याची उपलब्धता पाहिल्यासही पाणीसाठा अत्यंत कमी आहे. राज्यात पहिला-वहिला पायलट प्रोजेक्ट ठरलेल्या कुकडी प्रकल्पातील धरणांची पाण्याची एकंदरीत परिस्थिती पाहता महत्त्वाच्या डिंभे धरणात केवळ ४० टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे. चालू वर्षी धरण पाण्याने पूर्ण क्षमतेने भरण्याच्या आशा जवळ-जवळ मावळल्या अहोत. कारण जुलै महिना अखेर धरणामध्ये पन्नास टक्क्याहून अधिक पाणीसाठा उपलब्ध असतो. प्रकल्पांतर्गत असणाऱ्या येडगाव, माणिकडोह, वडज, पिंपहगावजोगे या धरणांमध्येदेखील अद्याप पर्यंत ४० टक्क्याहून कमी पाणीसाठा आहे. यावर्षी पावसाने दडी मारल्याने आता दुबार पेरणीची वेळ टळून गेली. त्यामुळे राज्यातील बहुतांशी भागात पाण्याबरोबर जनावरांच्या चाऱ्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला. त्यात भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा समजल्या जाणाऱ्या शेती व्यवसायाची शेतकरी वर्गाची आर्थिक गणिते याच हंगामावर अवलंबून असल्याने त्यांचे 'सालचंदी' चे नियोजनही हुकले आहे. पावसाच्या झाल्याने गेल्या काही वर्षात शेतकरी वर्गाला प्रथमच दुष्काळ सदृश परिस्थितीला सामोरे जाण्याची वेळ आली. दुष्काळावर मात करण्यासाठी सरकारने रोजगार हमीची कामे करणार असल्याचे जाहीर केले. शासनाने दुष्काळनिवारणा करीता केलेल्या उपाययोजनांचे स्वागतच आहे. मात्र या समस्यांच्या खोलात आपण केव्हा जाणार, हा खरा प्रश्न आहे. प्रश्न केवळ शेतकऱ्यांची रोजी-रोटी सुटण्याचा नाही. कमी पावसामुळे आधीच ढासळलेली वीज निर्मिती आणि व्यवस्थापन पूर्णतः कोलमडणार आहे. त्यामुळै राज्यातील वीजकपातीत आणखी वाढ करून भारनियमात वाढ करावी लागणार आहे. दुष्काळाचा सामना करताना राज्यकर्त्यांनी उद्भवणाऱ्या सर्व गोष्टींचा विचार करायला हवा. राज्य सरकारने दुष्काळावर मात करण्यासाठी घेतलेले निर्णय प्रभावी पणे राबविले गेले तरी काहीवेळा त्यामध्येही राजकीय स्वार्थ आडवा आला तर घेतलेले महत्त्वाकांक्षी निर्णय कुचकामी ठरतात हे सत्य नाकारता येणार नाही. 'पाणी आडवा' पाणी जिरवा या नावाखाली प्रचंड प्रमाणात पैशाची लूट होते. परंतु त्यासारख्या योजना करण्यासाठी राजकयी शक्ती लावण्याचे भावनिक राजकारण, मारामाऱ्या करणाऱ्या राजकीय पक्षांना कधी सूचतच नाही. राज्यातील वनसंपदा तोडली जात असताना शासन त्याकडे गांभीर्याने लक्ष देत नाही. वनसंपदेचा ऱ्हास होत असल्याने त्यातून झिरपणारे पावसाचे पाणी दिवसेदिवस कमी होत आहे. नद्यांच्या पाण्याचे स्रोत बेसुमार वाळू उपाशामुळे जवळ-जवळ संपले आहे. जंगलातील झाडे जाळण्याच्या प्रकारांमधून मातीची प्रचंड धूप होऊन धरणे गाळानेच भरत आहेत. अशा परिस्थितीत ज्यावेळी दुष्काळाचा सामना करावा लागतो, त्यावेळी मानवानेच केलेल्या नैसर्गिक हानीचे परिणाम सर्वांनाच भोगावे लागतात. दुष्काळाच्या उंबरठ्यावर पोहचलेल्या राज्यात पुढील काही दिवसात पाऊस पडण्याची शक्यता आहे. दरम्यान दुष्काळाची यावर्षी सर्वांनाच झळ पोहचली असून गेल्या काही वर्षात पावसाळ्यातील जून आणि जुलै या दोन महिन्यात नेहमीप्रमाणे सरासरी इतका पाऊस पडला. यंदा मात्र जुलै महिनाअखेरीस सरासरीच्या ५० टक्केदेखील पाऊस पडला नाही.

**नवोदित वृत्तपत्रांच्या संपादकांना सुवर्ण संधी**

**सदस्य नोंदणी अभियानात सहभागी व्हा व आपल्या वृत्तपत्राचे आर. एन. आय. रजिस्ट्रेशन व जाहिरात यादीवर येणे संदर्भातील मार्गदर्शनासाठी चा लाभ घ्या.**

**पत्ता : साप्ताहिक : न्यायस्वातंत्र्य समता,**
चोरडिया बिझनेस सेंटर, केबिन नं. २, जुनी जिल्हा परिषद जवळ,
(पुणे स्टेशन जवळ) सोमवार पेठ, पुणे - ४११००१.
अधिक माहितीसाठी संपर्क :
**रमेश शेळके, मो. : ९५६१९२४३२३**
E-mail - ramesh.shelke24@ yahoo.com

टिप : पुण्य प्रभााव संपादक, प्रकाशक, वृत्तपत्र महासंघ (रजि.) महाराष्ट्रात कार्यरत असून संघाचे २५० संपादक सदस्य आहेत. आपणही आपले नाव नोंदणी करू शकता.

# तिजोरीतील दुष्काळ दूर करण्यासाठी १६०० कोटींची कर वाढ

## पेट्रोल, डिझेल २ रूपये अधिभार; मद्य, सिगारेटवर पाच टक्के अतिरिक्त कर






मुंबई : गारपीट, अवकाळी पाऊस आणि त्या पाठोपाठ आलेल्या दुष्काळामुळे तिजोरीवर पडलेला ताण व महसुलात झालेली प्रचंड घट यामुळे आर्थिक संकटात सापडलेल्या राज्य सरकारने १६०० कोटी रुपयांची करवाढ करण्याचा निर्णय आज घेतला. मद्य, सिगारेट व वायूमिश्रित शीतपेये या चैनीच्या वस्तूंवर ५ टक्के अतिरिक्त कर बसविण्यात आला असून सोने आणि हिऱ्यांच्या दागिन्यांवरील करही १ टक्क्यावरून १.२० टक्के करण्यात आला आहे. डिझेल आणि पेट्रोलवरही प्रतिलीटर दोन रुपये अधिभार लावण्यात आला असून महागाईने जेरीस आलेल्या सर्वसामान्यांना या करवाढीचा मोठा फटका बसणार आहे. हा अधिभार लादताना महापालिका क्षेत्रातील पेट्रोल व डिझेलवरील स्थानिक संस्था कर (एलबीटी) रद्द करण्यात आल्याने तेथे फारसा फरक पडणार नसला तरी मुंबई व ग्रामीण भागातील दर मात्र दोन रुपयांनी वाढणार आहेत. ही करवाढ केवळ पुढील पाच महिन्यांसाठी असून मार्चमध्ये नवीन अर्थसंकल्प सादर करताना याचा फेरविचार केला जाईल, असे अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी स्पष्ट केले.

मागच्या वर्षापासून राज्याला सातत्याने कोणत्या ना कोणत्या नैसर्गिक आपत्तीचा सामना करावा लागत आहे. अपुऱ्या पावसामुळे मराठवाड्यासह चौदा जिल्ह्यांवर भीषण दुष्काळाचे संकट ओढवले आहे. दुष्काळ निवारणाच्या उपाययोजनांवर कोट्यवधी रुपये खर्च करावे लागत असताना मूल्यवर्धित कर (व्हॅट) व अन्य करांमधून मिळणाऱ्या महसुलात प्रचंड घट झाल्याने सरकारचे कंबरडे मोडले आहे. तिजोरीतील खडखडाटाचा फटका विकासकामांना तर बसला आहेच, पण कर्मचाऱ्यांचे पगार व दैनंदिन खर्च भागविण्यासाठीही कर्ज काढण्याची वेळ सरकारवर आली आहे. या परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी १६०० कोटी रुपयांची करवाढ करण्याचा निर्णय आज राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. आधीच महागाईने जेरीस आलेल्या जनसामान्यांवर या करवाढीचा थेट भार येऊ नये यासाठी मद्य, सिगारेट, शीतपेये अशा चैनीच्या वस्तूंवर ही करवाढ लादण्यात आल्याचा दावा सरकारकडून करण्यात आला असला तरी पेट्रोल व डिझेलवर सरसकट दोन रुपये अधिभार लावल्याने सर्वसामान्यांना त्याची झळ बसणार आहे. एका हाताने दिले, दुसऱ्या हाताने घेतले! महापालिका क्षेत्रातील ५० कोटींच्या

(पान ४वर)

## कॉफी आरोग्यदायी उत्तेजक

प्रत्येक स्वयंपाकघरात चहाच्या जोडीला कॉफी हे उत्तेजक पेय जरूर असते. अरब देशातून कॉफीचे आगमन झाले आणि चेन्नइ, म्हैसूर, कुर्ग प्रांतात कॉफीचे पीक येऊ लागले. कॉफीच्या बिया भाजून त्याची बनवलेली पावडर दूध, पाणी, साखरेबरोबर उकळून कॉफी म्हणून पितात. कॉफीमध्ये कॅफीन नावाचे रासायनिक द्रव्य असतं. हे द्रव्य उत्तेजक आहे. कॉफी प्यायल्यावर ताबडतोब तरतरी येते. याचे कारण कॉफी हृदयोत्तेजक आहे. म्हणूनच कॉफी प्यायल्याबरोबर ताबडतोब उत्साह निर्माण होतो. कॉफीमुळे मेंदूतील केंद्रे उत्तेजित होतात त्यामुळे श्रम आणि थकवा दूर होतो. कॉफी अगदी कमी प्रमाणात घेतल्यास भूक वाढते. जास्त प्रमाणात घेतल्यास भूक नष्ट होते. मलावरोध निर्माण होतो. मुखदुर्गंधी, दाढा किडणे, दातदुखी या तक्रारीत कॉफीच्या काढ्याने खळाळून चूळ भरली असता त्रास कमी होतो. कॉफी प्यायल्याबरोबर अंगदुखी, डोकेदुखी थांबते.

कॉफी हे अफूचे प्रतिविष आहे. अफूची नशा चढली असेल तर कॉफी प्यायला दिल्यास नशा उतरते. कॉफी प्यायल्यानं अंगात भरपूर उष्णता निर्माण होते. त्यामुळे थंडीपासून रक्षण होते. कॉफीमुळे सुस्ती आणि आळस दूर होऊन उत्साह निर्माण होतो. कॉफी प्यायल्यानंतर कॉफीचे उत्सर्जन मूत्रावाटे होते. मूत्रमार्गातील रक्तवाहिन्यांचा विस्तार होतो. त्यामुळे लघवी तटणे, बारीक मूतखडा यामुळे लघवीच्या मार्गात जळजळ, आग, वेदना होत असेल तर कॉफी प्यायल्याने त्रास तात्पुरता कमी होण्यास मदत होते. मलेरिया (विषमज्वर) टायफॉईड, या आजारातील प्रारंभिक अवस्थेत कॉफी प्यायला दिल्यानं आराम वाटतो. कॉफीच्या ज्वरहर गुणामुळं ताप कमी होतो.

## पालकमंत्री गिरीश बापट यांच्या हस्ते मुंढवा जॅकवेलचे उद्घाटन



पुणे : महानगरपालिकेच्यावतीने उभारण्यात आलेल्या मुंढवा जॅकवेलचे उद्घाटन पालकमंत्री गिरीश बापट यांच्या हस्ते गुरूवारी झाले.

मुंढवा केशवनगर येथे सांडपाण्यावर प्रक्रिया करून साडेसहा टीएमसी पाणी सिंचनासाठी उपलब्ध करून देण्यासाठी उभारण्यात आलेला जॅकवेल, पंपहाऊस आणि साडेतीन किलोमीटरच्या पाईपलाईनचे उदघाटन करण्यात आले. यावेळी जलसंपदा राज्यमंत्री विजय शिवतारे, महापौर दत्तात्रय धनकवडे, खासदार शिवाजीराव आढळराव-पाटील, आमदार अजित पवार, आमदार जगदीश मुळीक आदी उपस्थित होते. पुणे महानगरपालिका आणि खडकवासला पाटबंधारे विभाग यांच्यातील करारनाम्यानुसार ११.५० टीएमसी पाणीसाठा उपलब्ध करून देताना ६.५० टीएमसी प्रक्रिया केलेले सांडपाणी मुठा उजवा बेबी कालव्यात सिंचनासाठी उपलब्ध करून देण्याची अट अंतर्भूत आहे. त्याअनुषंगाने पुणे महानगरपालिकेकडून ६.५० टीएमसी पाणी सिंचनासाठी उपलब्ध करून देण्यासाठी ही योजना करण्यात आली आहे.

यावेळी महापालिका आयुक्त कुणाल कुमार, अतिरिक्त आयुक्त ओमप्रकाश बकोरिया, जलसंपदा विभागाचे अतुल कपोले, खडकवासला विभागाचे लोहार आदी उपस्थित होते.

## करियरसाठी प्लॉनिंग आवश्यक

इयत्ता दहावी ही करीयरची पहिली पायरी समजली जाते. दहावीचं वर्ष जसं महत्त्वाचं असतं तसंच धोक्याचंही असतं. हे आपल्याला ठाऊक असेलच. या वयात मुलांना पंख फुटतात, असे त्यांचे पालक म्हणतात. या वयात अर्थात सोळाव्या वयात मुलांची पालक त्यांची जरा जास्तच काळजी घेत असतात. अशा मुले विषय निवडण्यात डगमजतात. करीयरचं प्लॉनिंग करू शकत नाहीत.

बाबांनी सांगतिलं म्हणून मी अमक्या विषयाची निवड केली, माझ्या मित्रांने टमक्या विषयात प्रवेश घेतला म्हणून, मी ही इकडे वळलो, अशी उत्तरे विद्यार्थ्यांमधून येतात. मात्र करीयरसाठी प्लॉनिंग हे आपण स्वतःच केलं पाहिजे हे विद्यार्थी विसरतात अथवा तेव्हा त्यांना या गोष्टीचं फारसं ज्ञानही नसतं. पालकांनी आधी आपल्या पाल्याची इच्छा जाणून घेणे गरजेचे असते. मात्र, पालक हे आपल्या पाल्याचे काहीच ऐकूण न घेता. त्यांची इच्छा नसताना, नावडत्या विषयाला प्रवेश घेवून देतात व सगळं गणित चुकतं.

प्रत्येकाने करियर प्लॉनिंग करणं हे गजरेचं आहे. प्रत्येकाने स्वतःची परीक्षा घेतली पाहिजे व आपण पास की नापास हे ठरवून स्वतःची अभरूची व क्षमता ओळखली पाहिजे. त्यानुसारच करीयर




क्षेत्र निवडले पाहिजे. विषयाची आवड आणि भविष्यातील संधी ओळखून त्या संदर्भात योग्य माहिती स्वतःच घेतली पाहिजे.

काही विद्यार्थी लाजाळू, परंपरावादी, दुसऱ्यांवर चटकन प्रभावीत होणारे असतात. त्यांच्यात निर्णय घेण्याची क्षमताही फारशी नसते. अशा विद्यार्थ्यांना करीयरची दिशा ठरविण्यात अडचणी येतात. असे विद्यार्थी पालक अथवा करीयर गाईडकडून मार्गदर्शन घेऊन करीयरची दिशा निश्चित करून त्या दिशेन यशस्वी वाटचाल करू शकतात.

## सांगवी पोलिसांचे मंडळांकडून आभार

**(पान १ वरून)** पार पाडण्यात अत्यंत मोलाचे असे काम पोलिसांनी केले. अशा सर्व गोष्टी लक्षात घेवून नवी सांगवीतील शिव प्रतिष्ठान मंडळाचे संस्थापक श्री. प्रसाद पवार व कार्याध्यक्ष प्रशांत माकर समवेत बचाराम पाटील, शंकर माकर, मधुकर भाईगडे, संजय गवंडळकर, अर्जुन कुंभार, श्रीस्वामी, श्री. पांचाळ, दामोदर डामसे, श्री. गाडेकर तसेच प्रतिष्ठानचे सर्व कार्यकर्त्यांनी पीआय नौकुडकर, पीआय ढगे, एपीआय शिंदे, एपीआय ननावरे, पीएसआय मिसाळ, एएसआय दाभाडे व लिपीक श्री. काकडे या सर्व पोलिस कर्मचाऱ्यांचे शिव प्रतिष्ठान मंडळांनी सर्व मंडळांतर्फे आभार मानले.

## कन्याकुमारी अश्वमेध यज्ञ

**जानेवारी २८ ते ३१ जानेवारी**

**स्थान : विवेकानंद केंद्र, कन्याकुमारी (तामिळनाडू)**

**आयोजक :** अखिल विश्व गायत्री परिवार, दक्षिण भारत झोन

१. २५१ कुंडीय यज्ञ शाळा
२. भारतीय संस्कृतीचे प्रदर्शन
३. सर्व देशातून, जगातून साधक येणार
४. यज्ञ, भोजन, रहाणे ईत्यादी सुविधा मोफत
५. विशाल साहित्य प्रदर्शन

**❑ कार्यक्रम रूपरेखा ❑**

- २८/०१/२०१६ सकाळी विशेष ध्यान, ५१०० कळस यात्रा
- २९/०१/२०१६ सकाळी विशेष ध्यान, देवपूजन, विशाल यज्ञ, संध्याकाळी सांस्कृतिक कार्यक्रम
- ३०/०१/२०१६ सकाळी विशेष ध्यान, यज्ञ संस्कार, संध्याकाळी ५१०० दीप यज्ञ
- ३१/०१/२०१६ सकाळी विशेष ध्यान, महापूर्णाहुती.

# विशेष प्राविण्यासह अभ्यासक्रम पूर्ण केलेले मान्यवरांची क्षणचित्रे








## तिजोरीतील दुष्काळ दूर करण्यासाठी...

(पान १ वरून) आत उलाढाल असलेल्या व्यापाऱ्यांना स्थानिक संस्था करातून वगळण्याचा करण्याचा निर्णय सरकारने यापूर्वीच घेतला आहे. मात्र, पेट्रोल व डिझेलवरील एलबीटी कायम ठेवण्यात आला होता. हा कर रद्द करण्यात यावा यासाठी पेट्रोल व डिझेल वितरकांनी बेमुदत संप करण्याचा इशाराही सरकारला दिला होता. अखेर ही मागणी मान्य करत पेट्रोल-डिझेलवर लागू असलेला स्थानिक संस्था कर रद्द करण्याचा निर्णय आज मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. त्यामुळे सरकारला ३५० कोटी रुपयांच्या महसुलावर पाणी सोडावे लागणार असले तरी एका हाताने ही सवलत देताना दुसऱ्या हाताने पेट्रोल व डिझेलच्या विक्रीवर प्रतिलिटर २ रुपये अधिभार लावण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. स्थानिक संस्था कर केवळ महापालिका क्षेत्रात लागू होता. मात्र, हा अधिभार संपूर्ण राज्यावर लागू होणार आहे. त्यामुळे महापालिका क्षेत्रातील पेट्रोल, डिझेलच्या किमतीत फारसा फरक पडणार नसला तरी ग्रामीण भागाला याचा चांगलाच फटका बसणार आहे. मुंबई शहरात एलबीटी नव्हताच. त्यामुळे उर्वरित महाराष्ट्राप्रमाणे मुंबईतही पेट्रोल-डिझेलचे दर दोन रुपयांनी वाढणार आहेत. मुंबईत सध्या पेट्रोल-डिझेलवर २६ टक्के व्हॅट व एक रुपया अधिभार आहे. हा अधिभार आता तीन रुपये होईल. या अधिभारातून सरकारला ८०० कोटी रुपयांचे अतिरिक्त उत्पन्न मिळण्याची अपेक्षा आहे.

पेट्रोल व डिझेलच्या किमतींमध्ये दोन वर्षांत मोठ्या प्रमाणात घट झाली आहे. २०१४ साली पेट्रोलचे दर ७९ रुपये लीटर होते, ते ६६ रुपयांपर्यंत खाली आले आहेत. डिझेलच्याही किमतीत अशीच घट झाल्याने त्यावरील करापोटी सरकारला मिळणाऱ्या महसुलातही मोठ्या प्रमाणात घट झाली आहे. दरमहा ३०० कोटी रुपये याप्रमाणे वर्षाला ३६०० कोटी रुपयांचा फटका राज्य सरकारला बसला आहे.

आर्थिक मंदी व दुष्काळामुळे बाजारातील उलाढालही थंडावली आहे. परिणामी करांतून मिळणारा महसुलातही मोठी घट झाली आहे. अवकाळी पाऊस, गारपीट, पीक विमा, दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना दिलेली मदत यासाठी गेल्या वर्षभरात जवळपास साडेतीन हजार कोटी रुपये खर्च करावे लागले आहेत तर दुसरीकडे टोल व एलबीटीमध्ये दिलेल्या सवलतीचा सुमारे ६ हजार कोटींचा भार आणि उत्पन्नात झालेली घट यामुळे राज्याच्या तिजोरीत खडखडाट झाला होता. हा खड्डा भरून काढण्यासाठी १६०० कोटी रुपयांची करवाढ करण्यात आली आहे. येत्या मार्च महिन्यात राज्याचा २०१६-१७ चा अर्थसंकल्प मांडला जाईल, तेव्हा या सर्व करांचे पुनर्विलोकन करून वस्तू व सेवा करप्रणालीशी (जीएसटी) सुसंगत धोरण आखले जाईल, असे अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी सांगितले.


**‘गीत गाता चल’**

जुन्या हिंदी मराठी गाण्यांचा सुरेल नजराना कार्यक्रमासाठी संपर्क करा - ॲड. चंद्रकांत गायकवाड - ९८२३४९३८०८



0% व्याज

सुवर्ण संधी ! सुवर्ण संधी !! सुवर्ण संधी !!!

कोकणातील निसर्गाच्या साविध्यातील एक सुंदर प्रकल्प !

उत्तम भविष्यासाठी ...एकमेव पर्याय ...जमिनीतील गुंतवणूक

0% व्याज

निसर्गरम्य आणि प्रदुषण विरहित मंडणगड व महाड या कोकण परिसरात सर्व सामान्य जनतेसाठी परवडेल अशा त्यांच्या स्वप्नपूर्तीसाठी व्हीजन सिटी लॅण्डमार्क प्रा. लि. यांच्यावतीने स्वत:च्या हक्काच्या जमिनीचे मालक व्हा !

**व्हिजन सिटी लॅण्डमार्क प्रा. लि.**

नवनिर्मित

**द ग्रीन स्टोन फार्म**

पुणे स्टेशनपासून अंदाचे १६० कि.मी. अंतरावर रायगढ, रत्नागिरी, हिरहरेश्वर बीज, मंडणगड या निसर्गरम्य परिसरात स्वस्त दराने व सुलभ हप्त्याने शेत जमिन, भव्य बंगलो प्लॉट उपलब्ध आहे.

**प्लॉटची वैशिष्टये**

१) २० फुटी अंतर्गत रस्ते
२) क्लिअर टायटल प्रॉपर्टी
३) सुलभ हप्त्याची सुविधा ०% व्याज दराने
४) मुंबई - गोवा एस. एच. १०० पासून ४ कि.मी.
५) हरणे बीज ३५ कि.मी.
६) हरिहरेश्वर ४५ कि.मी.
७) मंडणगड एम.आय.डी.सी.पासून १ कि.मी.
८) करंजवाडी रेल्वे स्टेशन ५ कि.मी.

| ग्रीन स्टोन फार्म फेज - ३ | |
|---|---|
| ५,००० स्क्वे फू. (५ गुंठे) | रु. २,०००००/- |
| बुकींग | रु. २५,०००/- |
| उर्वरीत रक्कम | रु. १,७५,०००/- |
| % व्याजदराने ५५ महिने | रु. ४,००० ५५ मासिक हप्ता |

रु.१० लाख प्रति एकर
काजू व आंब्याच्या लागवडीसह
बुकिंग रक्कम रु. १०,०००/-
अगाऊ रक्कम रु. ३ लाख
उर्वरीत रक्कम ५५ हप्त्यामध्ये प्रति हप्ता
रु. १५,०००/- तेही ०% व्याजदराने

ऑफर फक्त मर्यादित कालावधीसाठी
नियम व अटी लागू
ऑफिसवरुन साईट पाहण्यासाठी गाडीची सोय

अधिक माहितीसाठी त्वरीत संपर्क साधा :- व्हिजन सिटी लॅण्डमार्क प्रा. लि.

रजि. ऑ. : मेरीविल्ला, स. नं. ७८/४/१, संत गजानन महाराज नगर, रस्ता नं. २, मोसरी आळंदी रोड, दिघी, पुणे.

ब्रॅच ऑफिस : ४३१/अ, शॉप नं. १३, सिध्दिविनायक केशर कॉम्प्लेक्स, सोमवार पेठ, नरपतगिरी चौक, पुणे ११. फोन : ०२०-४१२३११२२

ब्रंच ऑफिस : गणेश मंदिरा शेजारी, गणेशनगर, बोपखेल, पुणे - ३१. फो. : ०२०-६५३१११२२.

संपर्क : 9371093338 रमेश शेळके : 9561924323

Website : www.visioncitylandmark.com Email : visioncitylandmarkpvtltd@gmail.com